महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१
Email ID : hted.vishi3-mh@gov.in

---

क्रमांक: संकीर्ण-२०२०/प्र.क्र.२४३/विशि-३ दिनांक :- १८ जानेवारी, २०२१.

आवक क्रं. 41/19.01.2021
श्री महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर

विषय :- श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर या महाविद्यालयास भौतिक सुविधा या घटकांतर्गत नवीन बांधकाम व नूतनीकरणाच्या कामासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :- १) राज्य प्रकल्प सहसंचालक, राज्य प्रकल्प संचालनालय, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांचे पत्र क्र. राप्रसं/रुसा/२०२०-२१/१०८० दि.२२/०९/२०२०
२) श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर यांचे पत्र क्र.एसएमटी/आस्था/२०२०-२१/१८२, दि.२८.०८.२०२०

**प्रस्तावना :-**

श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर या महाविद्यालयास भौतिक सुविधा या घटकांतर्गत रु. ०१.०० कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे. वितरीत करण्यात आलेल्या निधीच्या अनुषंगाने सदर महाविद्यालयाने उपरोक्त संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये नवीन बांधकामाचे रु.९५,४६,०८७/- व नूतनीकरणाचे रु.४१,७६,८९५/- असे एकूण रु.१,३७,२२,९८२/- रकमेचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरीता रुसा संचालनालयास सादर केले आहेत. त्याअनुषंगाने येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची सहसंचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये विनंती केली होती.

**ज्ञापन :-**

राज्य प्रकल्प संचालनालय (रुसा), मुंबई यांनी शिफारस केलेल्या श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर या महाविद्यालयाकरिता भौतिक सुविधा या घटकांतर्गत नवीन बांधकाम व इमारत नूतनीकरण करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या कामांसाठी रु.१,३७,२२,९८२/- एवढ्या रकमेच्या खर्चाच्या प्रस्तावास (सोबत Recapitulation Sheets जोडलेल्या आहेत) प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. प्रस्तावित नवीन बांधकामाचे रु.९५,४६,०८७/- व इमारत नूतनीकरणाचे रु.४१,७६,८९५/- असे एकूण रु.१,३७,२२,९८२/- रकमेची अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केली आहेत.

सदर मान्यता शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय भाग-२, दि. १७ एप्रिल, २०१५ मधील वितिय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग पाच मधील अ.क्र.१, नियम क्र. १३४ व अ.क्र. १० नियम क्र. १३४ तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्र-विअप्र/प्र.क्र.३०/१३/विनियम (भाग-२), दिनांक २० सप्टेंबर, २०१९ व शासन परिपत्रक,

सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. संकीर्ण-२०१९/ प्र.क्र.१०/ इमा-२, दिनांक २५ सप्टेंबर, २०१९ यानुसार प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

उपरोक्त बाबींवर होणारा खर्च "मागणी क्रमांक-डब्ल्यू-२, प्रधानशीर्ष- २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०३- विद्यापीठीय व उच्च शिक्षण, १०२ - विद्यापीठांना सहाय्य, - (०७) (०१) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत अशासकीय संस्थांना सहायक अनुदान (६० टक्के केंद्र हिस्सा) (२२०२ आय २६३) व (०७) (०२) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत अशासकीय संस्थांना सहायक अनुदान (४० टक्के राज्य हिस्सा) (२२०२ आय २७२), ३१ सहायक अनुदाने " या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा. यावरील खर्च प्रशासकीय मान्यता दिलेल्या रकमेच्या मर्यादेत राहील याची दक्षता घ्यावी. उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

प्रकुपवार

(प्रविणकुमार पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
३) महालेखापाल, (लेखा परीक्षण), महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपूर.
✓ ४) प्राचार्य, श्री महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर
५) कार्यासन अधिकारी (साशि-१), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर.
७) निवड नस्ती (विशि- ३)